‘साप्ताहिक शब्दरुतू’चे वार्षिक वर्गणीदार होण्यसाठी क्यूआर कोडवर वार्षिक किंवा मासिक योजनांचे पेमेंट करून मो. ९०११२०१४१४ या व्हाट्सअॅप नंबरवर स्क्रिनशॉट व आपला पूर्ण पत्ता पाठवावा.
**वार्षिक वर्गणी : १८० । मासिक वर्गणी : १४**

# शब्दरुतू

पोस्टल परवाना नं. SRP/136/2023-2026
संपर्क : मो. ९०११२०१४१४
कार्यकारी संपादक : सुमीत लांडे, मुंबई
Email ID : shabdarutu@gmail.com

✻ वर्ष ३ रे ✻ अंक ६ वा ✻ रविवार दि. १६ नोव्हेंबर २०२५ (Decl.Regd.No. SR/MAG/11/2021) RNI.NO.MAHMAR/2021/84232 पाने ४ ✻ किंमत ४ रु. साप्ताहिक (Weekly)

### अल फलाह विद्यापीठाचं सदस्यत्व रद्द

**नवी दिल्ली ।** द असोसिएशन ऑफ ऑल इंडियन यूनिवर्सिटीजकडून अल फलाह विद्यापीठाचं सदस्यत्व रद्द करण्यात आलं आहे. त्यासाठी गुड स्टैंडिंगची कमतरता असं कारण देण्यात आलं आहे. द असोसिएशन ऑफ इंडियन यूनिवर्सिटीजनं म्हटलं की त्यांच्या उपनियमानुसार सर्व विद्यापीठांनी गुड स्टैंडिंग्जचं मध्ये असणं आवश्यक आहे. मात्र, मीडिया रिपोर्टसनुसार अल फलाह विद्यापीठ, फरिदाबाद हरियाणामध्ये गुड स्टैंडिंग्जचा अभाव असल्याचं समोर आलं आहे.

### नवी कोरी पुस्तकं




**अकुतोभय**
: लेखकाचे नाव :
**नीलेश केदारी शेळके**
किंमत रु. : १४०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन**




**संदर्भासहित स्पष्टीकरण**
: लेखकाचे नाव :
**शरावती इंगवले-यादव**
किंमत रु. : १२०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन**

# बिहारमध्ये एनडीएला २०२ जागा

## बिहारमध्ये सर्वाधिक मते राजदला, तरीही अवघ्या २५ जागा । नीतीश कुमार दहाव्यांदा शपथ घेणार?

**पटना :** बिहार विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाले आहेत. बिहार विधानसभेतील २४३ पैकी २२५ जागा जिंकण्याचे उद्दिष्ट ठेवून एनडीएने निवडणुकीची तयारी सुरू केली. उर्वरित १८ जागा उर्वरित विरोधी पक्षांमध्ये विभागल्या जातील. हे अगदी बरोबर घडले नाही. एनडीएला २०२ जागा मिळाल्या आहेत. कदाचित एनडीएलाही असा मोठा विजय अपेक्षित नव्हता. घटक पक्षांचे सर्व प्रमुख नेते १६०-६५ जागा जिंकण्याबद्दल किंवा प्रचंड विजयाबद्दल बोलत राहिले. या निवडणुकीत आरजेडीचे माय (मुस्लिम-यादव) समीकरण कोसळले. सीमांचलमधील मुस्लिमांनी आरजेडीपेक्षा एआयएमआयएमवर जास्त विश्वास ठेवल्याचे दिसून आले. प्रशांत किशोर यांच्या जन सूरज उमेदवारांची



पुरती धुळदाण झाली.

दरम्यान, बिहारमध्ये महाआघाडीला दारूण अपयश आलं असलं, तरी निवडणूक आयोगाने दिलेल्या आकडेवारीनुसार तब्बल २३ टक्के मते राष्ट्रीय जनता दलाला मिळाली आहेत. मात्र त्यांच्या खात्यामध्ये अवघ्या २५ जागा आहेत. भाजपची मतांची टक्केवारी २०.८ टक्के राहिली. नितीश कुमार यांच्या जेडीयूला १९.२५ टक्के मते मिळाली. लोक जनशक्ती पक्षाला ४.९७ टक्के मते मिळाली. त्यामुळे मतांच्या विभागणीमध्ये आरजेडीने बाजी मारली आहे. दुसरीकडे काँग्रेसची टक्केवारी ८.७१% राहिली. सीपीआय एमला २.४ टक्के तर एमआयएमला १.८५% मते मिळाली. बहुजन समाज पार्टीला १.६२ टक्के मते मिळाली. इतरांच्या खात्यामध्ये १७.६८ टक्के मते गेली.

(पान २ वर)

### महाआघाडीच्या पराभवाची कारणे

१. घोषणा निष्प्रभ: महाआघाडी एनडीएची नक्कल करत असल्याचे दिसून आले. नितीशकुमार सरकारने घोषणांची तात्काळ अंमलबजावणी करून पुढाकार घेतला, तर महाआघाडी ‘‘सरकार स्थापन झाल्यावर आम्ही देऊ‘‘ अशा परिस्थितीत अडकली.
२. जागांचे वाद: पंतप्रधानांच्या दोन रॅलींनंतरही महाआघाडीने जागांचे वाद सोडवणे सुरू ठेवले. १२ जागांवर मैत्रीपूर्ण लढाया झाल्या. ‘‘मुख्यमंत्री चेहरा’’ यावरून दीर्घकाळ चाललेल्या वादामुळे महाआघाडी कमकुवत.
३. काँग्रेसमधील वाद: काँग्रेसच्या तिकिट वाटपावरून वाद निर्माण झाला. घोडेबाजाराचे आरोप समोर आले. साहनी यांची उपमुख्यमंत्रीपदाची इच्छा आणि डाव्या पक्षांची अधिक जागांची मागणी यामुळे आघाडीची प्रतिमा डागाळली.
४. कमकुवत प्रचार: तेजस्वी यांनी जवळजवळ एकट्याने प्रचार केला. खरगे, राहुल आणि प्रियांका यांनी खूप कमी सभा घेतल्या. एसआयआरचा मुद्दा जोरदारपणे उपस्थित केल्यानंतर, राहुल गांधी अचानक गायब झाले.
५. जमावबंदी: दुलारचंद यादव हत्याकांड प्रकरणात मोकामामध्ये उच्च जातींचे एकत्रीकरण झाले. त्यानंतर अनंत सिंह यांच्या अटकेने सुशासनाचा संदेश दिला. हे सर्व महाआघाडीच्या विरोधात गेले.

### नीतीश कुमार दहाव्यांदा शपथ घेणार

दरम्यान, नीतीश दहाव्यांदा विक्रमी मुख्यमंत्री म्हणून शपथ घेणार आहेत. निकाल २०१० च्या विधानसभा निवडणुकीसारखाच होता. फरक एवढाच होता की त्यावेळी जेडीयू सर्वात मोठा पक्ष होता, त्याने ११५ जागा जिंकल्या. भाजप ९१ जागांसह दुसऱ्या क्रमांकावर आला. यावेळी भाजप सर्वात मोठा पक्ष होता, तर जेडीयू दुसऱ्या क्रमांकावर होता. या वेळीही जेडीयू आणि भाजप एकत्र लढले. जेडीयूने जास्त जागा लढवल्या. यावेळीही जेडीयू आणि भाजपने समान जागा (प्रत्येकी १०१) लढवल्या.

## येणाऱ्या काळात काँग्रेसचे विभाजन होईल : पंतप्रधान

### काँग्रेस पक्ष १४० वर्षे सगळी वादळे सहन करुन टिकून राहिला : काँग्रेसचे प्रत्युत्तर

**नवी दिल्ली :** ‘‘बिहारच्या लोकांनी विकसित आणि समृद्ध बिहारसाठी मतदान केलं आहे. निवडणुकीवेळी मी जनतेला विक्रमी मतदान करण्याचा आग्रह केला होता आणि बिहारच्या जनतेने मतदानाचे सर्व विक्रम मोडीत काढले आहेत. प्रामुख्याने महिलांनी ही निवडणूक हाती घेतली होती. मी बिहारच्या





जनतेला एनडीएला प्रचंड बहुमत देण्याचा आग्रह केला होता आणि जनतेने आता आमच्या झोळीत बहुमत टाकलं आहे.

पंतप्रधान मोदी यांनी यावेळी दावा केला की ‘‘बिहारमध्ये भाजपाने जितक्या जागा जिंकल्या आहेत तितक्या जागा काँग्रेसला मागील सहा राज्यांच्या विधानसभा निवडणुकांमध्ये मिळून जिंकता आलेल्या नाहीत. ते आता केवळ नकारात्मकता पसरवण्याचं राजकारण करत असतात. कधी चौकीदार चोर है चा नारा देतात, **(पान २ वर)**

## रोहिणी आचार्य यांनी तोडले कुटुंबाशी संबंध

**पटना :** बिहारमध्ये राष्ट्रीय जनता दलाच्या दारुण पराभवानंतर यादव कुटुंबात दुफळी निर्माण झाली आहे. लालू यादव यांच्या कन्या रोहिणी आचार्य यांनी ट्विट करत कुटुंबाशी संबंध तोडण्याचा निर्णय जाहीर केला. एका पोस्टमध्ये त्यांनी राज्यसभा खासदार संजय यादव यांचा उल्लेख करत म्हटले आहे की, ‘‘मी सर्व दोष स्वतःवर घेत आहे.’’ आचार्य यांनी लिहिले



आहे की, ‘‘मी राजकारण सोडत आहे आणि माझ्या कुटुंबाशी संबंध तोडत आहे. संजय यादव आणि रमीज यांनी मला हे करण्यास सांगितले आणि मी सर्व दोष स्वतःवर घेत आहे.’’ आचार्य यांनी सुरुवातीला फक्त राजकारण सोडण्याबद्दल आणि कुटुंबाशी संबंध तोडण्याबद्दल लिहिले होते. तथापि, नंतर मजकूर संपादित करून संजय यादव आणि रमीज यांचं नावे समाविष्ट करण्यात आलं. लालू यादव किडनी विकाराने त्रस्त असताना मुलगी रोहिणी यांनी आपली एक किडनी दान केली होती. निवडणुकांच्या निकालानंतर त्यांनी संबंध तोडल्यामुळे आश्चर्य व्यक्त होत आहे.

### संक्षिप्त

#### महाराष्ट्रातील ४५ टक्के ‘स्टार्टअप’ महिलांचे : फडणवीस

**मुंबई :** महाराष्ट्र ही स्टार्टअपची राजधानी असून देशात सर्वाधिक नोंदणीकृत स्टार्टअप हे महाराष्ट्रात आहेत. त्यात ४५ टक्के स्टार्टअप्स महिलांच्या नेतृत्वाखाली आहेत. या स्टार्टअपमधूनच भविष्यात मोठे उद्योजक देशाला मिळतील असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी व्यक्त केला. एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या ‘इनोव्हेशन महाकुंभ २०२५’ चे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जुहू येथील विद्यापीठ परिसरात झाले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

## महाराष्ट्र जलसंपदा विभाग भारतात प्रथम

**मुंबई :** केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाने राज्याच्या जलसंपदा विभागाला बेस्ट स्टेट कॅटेगरी २०२४ मध्ये प्रथम क्रमांकाच्या मानाच्या पुरस्काराने केलेला गौरव अभिमानास्पद असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली दुष्काळमुक्त महाराष्ट्राच्या संकल्पनेला पाठबळ देणारा गौरव असल्याची प्रतिक्रीया



जलसंपदा मंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केली. **(पान २ वर)**

## केंद्र सरकार बँकांचे विलिनीकरण करण्याच्या तयारीत

**नवी दिल्ली:** केंद्र सरकार लहान सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे विलिनीकरण (मर्जर) करण्याच्या तयारीत आहे. या निर्णयानंतर देशात फक्त चार प्रमुख सरकारी बँका शिल्लक राहणार आहेत. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितले की, भारताला जागतिक दर्जाची बँकिंग सिस्टीम हवी आहे. भारतीय बँकांना जगातील टॉप बँकांच्या यादीत आणण्यासाठी त्यांना अधिक मोठं आणि सक्षम बनवणे आवश्यक आहे. यासाठी सरकार आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्यात सध्या चर्चा सुरू आहे.

सध्या देशात १२ सार्वजनिक क्षेत्रातील बँका आहेत, केंद्र सरकार ही संख्या फक्त चार मात्र प्रमुख बँकांपर्यंत आणण्याचा विचार करत आहे. सरकारच्या या धोरणानंतर इतर सर्व लहान सरकारी बँकांचे विलिनीकरण



फक्त चार प्रमुख बँका राहणार

केले जाऊ शकते. या बदलामुळे देशाच्या बँकिंग क्षेत्रात मोठा बदल होण्याची शक्यता आहे, तसेच बँकांची क्षमता आणि जागतिक स्पर्धेत त्यांचा स्थान मजबूत होण्याची अपेक्षा आहे. सध्या कोणत्या बँकेचं विलिनीकरण कोणत्या मोठ्या बँकेत होईल, हे निश्चित झालेलं नाही.

मात्र, संकेत आहेत की युनियन बँक ऑफ इंडिया आणि इंडियन बँक एकत्र करून देशातील दुसरी सर्वात मोठी सार्वजनिक बँक तयार केली जाऊ शकते. या विलिनीकरणामुळे देशभरातील २,२९,८०० कर्मचारी आणि लाखो ग्राहक प्रभावित होऊ शकतात. सरकारने कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्यांवर परिणाम होणार नाही, असे आश्वासन दिले असूनही, विलिनीकरणानंतर अनेक शाखा एकत्र किंवा बंद होण्याची शक्यता आहे.

**(पान २ वर)**

## श्रीनगरमधील नौगाम पोलिस स्टेशनमध्ये स्फोट

### ९ जण मृत्यूमुखी तर २७ जण जखमी

**श्रीनगर :** जम्मू - काश्मीरमधील श्रीनगरमधील नौगाम पोलिस स्टेशनमध्ये गुरुवारी रात्री ११:२० वाजता मोठा स्फोट झाला. यात ९ जणांचा मृत्यू झाला तर २७ जण जखमी झाले. मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. जखमींपैकी बहुतेक पोलिस अधिकारी आहेत. त्यांच्यावर ९२ आर्मी बेस आणि एसकेआयएमएस सौरा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

हरियाणातील फरीदाबाद



येथे अटक करण्यात आलेल्या डॉ. मुझम्मिल गनईच्या भाड्याच्या घरातून स्फोटके जप्त करण्यात आली. दिल्ली बॉम्बस्फोट प्रकरणात गनईला आधीच अटक करण्यात आली आहे. १० नोव्हेंबर रोजी दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ झालेल्या कार बॉम्बस्फोटात १३ जणांचा मृत्यू झाला होता.

### हा एक अपघात : डीजीपी प्रभात

जम्मू आणि काश्मीरचे डीजीपी नलिन प्रभात म्हणाले की, हा एक अपघात होता. सॅम्पलिंग दरम्यान हा स्फोट झाला. मृतांमध्ये एक निरीक्षक, तीन फॉरेन्सिक टीम सदस्य, दोन गुन्हे शाखेचे छायाचित्रकार, दोन महसूल अधिकारी आणि एक शिंपी यांचा समावेश असल्याचे त्यांनी सांगितले.

## दिल्लीतील लाल किल्ला मेट्रो स्टेशनजवळ स्फोट

### १३ हून अधिक निष्पाप नागरिकांचा मृत्यू

**दिल्ली :** दिल्लीतील लाल किल्ला मेट्रो स्टेशनजवळ सोमवारी सायंकाळी झालेल्या भीषण कार स्फोटाने संपूर्ण देशाला हादरवून सोडले आहे. या स्फोटात १३ हून अधिक निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला असून, अनेक जण जखमी झाले आहेत. केंद्र सरकारने या घटनेला ’दहशतवादी कृत्य’ म्हणून घोषित केले असून, या प्रकरणाचा तपास आता राष्ट्रीय **(पान २ वर)**



### ६ डिसेंबरसाठी ३२ कार तयार होत्या...

आतापर्यंत अटक केलेल्या आठ दहशतवाद्यांनी बाबरी मशीद पाडल्याच्या वर्धापनदिनानिमित्त ६ डिसेंबर रोजी दिल्लीसह देशभरात विविध ठिकाणी बॉम्बस्फोट घडवण्याचा त्यांचा हेतू असल्याचे सांगितले होते, असे गुप्तचर यंत्रणांनी उघड केले आहे. यासाठी त्यांनी ३२ कारची व्यवस्था केली होती.

घटनेच्या आजूबाजूचे सीसीटीव्ही कॅमेरे आणि इतर सर्व गोष्टींसाठी तपासाचे आदेश देण्यात आले आहेत. माझी दिल्ली पोलीस आयुक्तांसोबत चर्चा झाली आहे. तसेच स्पेशल ब्रांचच्या इंचर्जासोबतही चर्चा झाली आहे. मी स्वतः घटनास्थळी आणि जखमींची विचारपूस करण्यासाठी रुग्णालयात गेलो होतो.

**- अमित शाह, केंद्रीय गृहमंत्री**

# जिल्हा दुष्काळमुक्तीच्या फक्त वल्गना; निधी मात्र नाही

## उपसा सिंचन योजनांच्या सर्वेक्षणासाठी १.८५ कोटींचा निधी । मंत्री विखे पाटील यांची पवारांवर टीका



**पारनेर :** जिल्हा दुष्काळमुक्त करण्याच्या फक्त वल्गना जाणात्या राजानी केल्या. कुकडी कालव्याच्या कामांना निधी उपलब्ध करून द्यावासा वाटला नाही. जिल्ह्यात फक्त राजकारणासाठी आले निधीसाठी मात्र मागे हटले, अशी घणाघाती टिका जलसंपदा मंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली, तालुक्यातील ४९ गावांसाठीच्या सहा उपसा सिंचन योजनांच्या सर्वेक्षणासाठी १ कोटी ८५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला असल्याची माहिती त्यांनी दिली.

कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या अतंर्गत कुकडी कालव्याच्या कामांचा शुभारंभ मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आला. महायुती सरकारने एकूण ४०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून, पहील्या टप्प्यातील १ते ६० किलो मीटरच्या कामासाठी ८२ कोटी रुपयांच्या निधी उपलब्ध करण्यात आला आहे. वर्षभरात ही सर्व काम पूर्ण करण्याची ग्वाही त्यांनी दिली. आ. काशिनाथ दाते आ. शरद सोनवणे जेष्ठ नेते बबनराव पाचपुते डॉ. सुजय विखे पाटील मुख्य अभियंता संजीलनव चोपडे अधिक्षक अभियंता अलका अहीरराव राहूल शिंदे विश्वनाथ कोरडे विजयराव औटी सचिन वराळ आदी याप्रसंगी उपस्थित होते.

आपल्या भाषणात मंत्री विखे म्हणाले की, १९८२ सालापासून या कालव्यांना निधी मिळाला नाही. अनेकांनी इथे येवून फक्त भाषण केली. कालव्याच्या काम ाला निधी उपलब्ध न झाल्याने चाळीस टक्के पाण्याची गळती होत आहे. १८०० क्युसेसने वाहाणारा कालवा आज १४०० क्युसेसवर आला. शेवटच्या गावाला पाणी मिळायचे असेलतर कालव्यांची काम केल्याशिवाय पर्याय नव्हता. जलसंपदा विभागाची जबाबदारी मि ळाल्यानंतर या कामाला आपण प्राधान्य दिले असून वर्षानुवर्षे पाण्यासाठी संघर्ष कराव्या लागणार्या गावांना काम करून न्याय द्यायचा आणि खासदार साहेबांचे स्वप्न पूर्ण करणे ही भूमिका महायुती सरकारची आहे.

अनेक वर्ष पाण्यापासून या भागाला वंचित ठेवले. पाणी असेल तर विकास आहे. रेडबुल वाटून विकास होणार नसल्याचा टोला लगावून तालुक्याची कामधेनू असलेला कारखाना विकण्याची वेळ कोणी आणली. कामगार देशोधडीला कोणी लावले. मुंबईत बसून कारखाने चालतात का असा सवाल उपस्थित केला. प्रयत्न करून कारखान्याची विक्री थांबवली. तालुक्याला पुर्नवैभव प्राप्त करून देण्यासाठी कारखाना शेतकऱ्यांच्या मालकीचाच राहीला पाहीजे आशी ठाम भूमिका मंत्री विखे पाटील यांनी मांडली. तालुक्यातील ४९गावांकरीता सहा उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्याच्या प्रस्तावाला मंजूरी दिली असल्याची माहीती देवून योजनांच्या सर्वेक्षणासाठी १कोटी ८५ लाख रुपयांचा निधी दिल्याचे विखे पाटील म्हणाले.

आ. काशिनाथ दाते यांनी आपल्या भाषणात वर्षानुवर्ष दुर्लक्षित झालेल्या कामांना मंत्री विखे पाटील यांच्या माध्यम ातून गती मिळाली. ही सर्व काम निर्धारीत वेळेत पूर्ण झाली तर दुष्काळी भागाला मोठा दिलासा मिळणार असल्याचे आहे. आ. शरद सोनवणे यांनी कालव्यांच्या कामाची सुरूवात म्हणजे दुष्काळी भागात जलक्रांती आहे. आम्ही पाणी मिळू देत नाही या आरोपातून मुक्तता झाल्याची प्रतिक्रीया आपल्या भाषणात करून जलसंपदा विभागाच्या माध्यमातून मोठे सहकार्य विखे पाटील यांच्या माध्यमातून मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

# मुंब्रामध्ये एटीएसची कारवाई, शिक्षक ताब्यात

**ठाणे :** जमाती इस्लामिया संघटनेशी संबंध असल्याच्या संशयावरून शिक्षकाला ताब्यात घेण्यात आले आहे. महाराष्ट्र एटीएसकडून मुंब्रा परिसरात मोठी कारवाई करण्यात आली. शिक्षकाच्या घरी सापडलेले कम्प्युटरसह इतर साहित्य एटीएसकडून जप्त करण्यात आले आहे. दहशतवादी विरोधी पथकाने महाराष्ट्रात कारवाईचा धडाका लावला आहे.

काही दिवसांपूर्वी एटीएसने सॉफ्टवेअर इंजिनीअरला ताब्यात घेतलं होतं. त्यानंतर आता ठाण्यातील मुंब्रा येथील एका शिक्षकाला ताब्यात घेतले आहे. जमाती इस्लामिया या संघटनेशी संबंधित असल्याच्या संशयावरून दहशतवादी विरोधी पथकाने कारवाई केल्याची माहिती मिळत आहे.

काही दिवसांपूर्वी पुणे या ठिकाणी महाराष्ट्र एटीएसने धाड टाकून काही लोकांना अटक केली होती. या आरोपींची विचारपूस केल्यानंतर आरोपींनी मुंब्रामध्ये राहणारा एका शिक्षकाचा संबंध असल्याचं सांगितलं होते. महाराष्ट्र एटीएसने आज मुंब्रा येथील कवसा विभागामध्ये राहणाऱ्या एका शिक्षकाच्या घरी धाड टाकली. शिक्षकाच्या घरातील मोबाईल कॉम्पुटर आणि इतर सामग्री हस्तगत करून त्याला मुंबई येथील कुर्ला येथे त्याचा दुसऱ्या घरी महाराष्ट्र एटीआयच्या माध्यमातून पुढील तपास सुरू आहे. शिक्षक हा जमाती इस्लामिया या संघटनेशी जोडलेले असल्यामुळे आरोपींनी या शिक्षकाचे नाव तपासामध्ये घेतला होता.

# पाचव्या वित्त आयोगाच्या अंमलबजावणीचा कालावधी वाढवला

**मुंबई :** राज्य मंत्रिमंडळ बैठकीत पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाच्या अहवालाच्या अंमलबजावणीचा कालावधी वाढविण्यास मान्यता देण्यात आली. त्यानुसार, ५ व्या वित्त आयोगाच्या अंमलबजावणीचा कालावधी १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ पर्यंत राहणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी कॅबिनेटची मंत्रिमंडळ बैठक संपन्न झाली. त्याम ध्ये, ५ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. सहकारी, विधि व न्याय, वित्त विभाग आणि जलसंपदा विभागासाठी २ असे एकूण ५ निर्णय घेण्यात आले. नाशिक,

नागपूर व धाराशिव या जिल्हा मध्यवती सहकारी बँकांना ८२७ कोटी रुपयांचे शासकीय भागभांडवल देण्यात येणार आहे. न्यायालयीन संकुले तसेच न्यायाधिशांची निवासस्थाने यांच्या सुरक्षेत वाढ करण्यात येणार आहे.



त्यासाठी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांच्याकडून अतिरिक्त सुरक्षारक्षक उपलब्ध करून घेण्यास व त्याकरिता खर्च तरतुदीस मान्यता देण्यात आली. त्याचबरोबर, हिंगोली जिल्ह्यातील डिग्रस साठवण तलाव प्रकल्पासाठी ९० कोटी ६१ लाख रुपयांच्या तरतुदीस मान्यता मिळाली.

### ज्योतिर्लिंगांचा सर्वसमावेशक विकास आराखडा

राज्यातील भाविक नियमितपणे ज्योतिर्लिंगांच्या दर्शनासाठी येतात, हे लक्षात घेऊन श्री क्षेत्र भीमाशंकर, श्री क्षेत्र औंढा नागनाथ व श्री क्षेत्र घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगांचा सर्वसमावेशक विकास आराखडा असावा. मंदिर परिसरात सुरू असलेली विकासकामे गतीने पूर्ण करून प्रस्तावित कामांचे योग्य नियोजन करा. या परिसरात भाविकांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यासाठी अत्याधुनिक एकात्मिक सुरक्षाप्रणाली कार्यरत करून भाविकांसाठी उत्कृष्ट दर्जाच्या सेवा सुविधा तयार करण्यासाठी गतीने कार्यवाही करावी.

**- देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

# अहिल्यानगर गुन्हे शाखेची बंगालमध्ये कारवाई

## चौघे जण ताब्यात । १ कोटी १ लाख ५ हजार रुपयांची चोरी



**अहिल्यानगर :** शहरातील सराफ व्यापाऱ्याचे तब्बल एक कोटी रुपयांचे सोन्याचे दागिने चोरून पसार झालेल्या आरोपींपैकी चौघांना स्थानिक गुन्हे शाखेने पश्चिम बंगालमध्ये गाठून अटक केली.

या कारवाईत पोलिसांनी ५१ लाख १३ हजार ७९५ रुपये किमतीचे, ५७२.७५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने हस्तगत केले आहेत. फिर्यादी कृष्णा जगदीश देडगावकर (वय ३२. रा. गायकवाड कॉलनी, सावेडी रोड) हे सोनार व्यवसायिक असून त्यांच्या दुकानात काम करणारे दिपनकर माजी, सोमीन बेरा, सोमनाथ सामंता, आन्मेश दुलोई, सत्तु बेग व स्नेहा बेरा या सहाजणांनी मालकाचा विश्वास संपादन करून लबाडीच्या हेतूने १ कोटी १ लाख ५ हजार रुपयांचे दागिने चोरून नेले. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. मा. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तयार करण्यात आले. पथकाने तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपींचा मागोवा घेत अमरागरी, जि. हावरा (पश्चिम बंगाल) येथे छापा टाकला. तेथे आरोपी सोमेन शांती बेरा उर्फ कार्तीक (३३), दिपनकर आरुण माजी (२२), अनिमेश मनोरंजन दोलुई (२५) आणि सोमनाथ जगनाथ सामंता (३०) यांना ताब्यात घेण्यात आले.

चौकशीत त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यांच्याकडून ५१ लाख १३ हजार ७९५ रुपयांचे, ५७२.७५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने जाप्त करण्यात आले. सदर मुद्देमाल कोतवाली पोलीस ठाण्यात जमा करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पो.उ.नि. संदीप मुरकुटे, पो.अं. शाहिद शेख, गणेश धोत्रे, फुरकान शेख, दिपक घाटकर, भिमराज खसे, राहूल डोके, सतिष भवर, प्रशांत राठोड यांच्या सहकार्याने करण्यात आली. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी पथकाचे कौतुक केले.

## थंड वाऱ्यामुळे राज्यात हुडहुडी वाढली

**पुणे :** उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांचा जोर वाढल्यामुळे राज्यात किमान तापमानात घट झाली आहे. राज्याच्या बहुतेक भागात कमाल आणि किमान तापमानात घट झालेली दिसून येत आहे. किमान तापमान दहा ते बारा अंश सेल्सिअस दरम्यान आहे. दिवसाही गार, बोचरे वारे वाहत असल्यामुळे राज्यभरात थंडी जाणवत आहे. राज्यात मंगळवारी जळगाव येथे सर्वात कमी ९.२ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार उत्तरेकडून येणाऱ्या थंड हवेचा जोर वाढला आहे.

# फुकटचा ताठा अन् नाव उबाठा : उपमुख्यमंत्री

**परभणी :** शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वी मराठवाड्याचा दौरा करत अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरून महायुती सरकारवर जोरदार टीका केली होती. उद्धव ठाकरेंनी त्या वेळी सरकार दगाबाज आहे असा आरोप करत म हायुतीच्या नेत्यांवर हल्लाबोल केला होता. त्यावर आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठवाड्यातील सभेत ठाकरेंवर पलटवार करत खरे दगाबाज कोण हे जनतेने ओळखले आहे असे प्रत्युत्तर दिले.

परभणी येथे झालेल्या शिवसेनेच्या (शिंदे गट) मेळाव्यात बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, उद्धव ठाकरे मराठवाड्यात नुसते येऊन गेले, पण एक बिस्किटचा पुडाही देऊन गेले नाहीत. जेव्हा सत्तेत होते, तेव्हाही त्यांनी शेतकऱ्यांसाठी काही केले का? आणि आता आम्हाला दगाबाज म्हणतात! काँग्रेसच्या दावणीला शिवसेना कोणी बांधली, हे सगळं जनतेला ठाऊक आहे, असेही ते यावेळी म्हणाले.

पान १ वरून

## बिहारमध्ये एनडीएला २०२ जागा

त्यामुळे मतांमध्ये बाजी मारली असली तरी आरजेडीला त्यांच्या खात्यामध्ये मात्र २५ जागा आल्या आहेत. त्यामुळे कदाचित महाआघाडीमधील इतर घटकपक्षांच्या मतांची टक्केवारी वाढली असती आणि एमआयएम आणि प्रशांत किशोरांच्या उमेदवारांची फटका बसला नसता, तर कदाचित महाआघाडीचा आकडा मोठा दिसून आला असता हे निश्चित आहे.

**बिहार निवडणुकीमधील मोठ्या अपडेट**

काँग्रेस आणि ओवेसी जवळपास मागे होते, काँग्रेसने ६ जागा जिंकल्या आणि ओवेसी यांनी ५ जागा जिंकल्या.

२९ मंत्र्यांपैकी २८ मंत्र्यांनी विजय मिळवला, तर मंत्री सुमित सिंह चकाईमधून पराभूत झाले. जन सूरज अपयशी ठरले, ९९ टक्के जागांवर डिपॉझिट जप्त झाले.

उपमुख्यमंत्री होणारे व्हीआयपी त्यांचे खातेही उघडू शकले नाहीत.

जेडीयूचे राधाचरण साह यांनी संदेश मतदारसंघात सर्वात कमी २७ मतांनी विजय मिळवला.

जेडीयूचे कलाधर मंडल यांनी रुपौली मतदारसंघात सर्वाधिक ७३,५७२ मतांनी विजय मिळवला.

## येणाऱ्या काळात काँग्रेसचे विभाजन होईल : पंतप्रधान

कधी संसदेत गोंधळ घालून संसदेचा मौल्यवान वेळ वाया घालवतात, प्रत्येक संस्थेवर हल्ला करत असतात, कधी ईव्हीएमवर प्रश्न उपस्थित करतात, कधी निवडणूक आयोगाला शिवीगाळ करतात, तर कधी मतचोरीचा आरोप करतात. ते देशाच्या शत्रूचं धोरण पुढे नेऊ पाहतायत.''

दरम्यान, मोदी यांच्या या टीकेला काँग्रेसचे नेते सचिन सावंत यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. सावंत यांनी एक्सवर यासंदर्भात एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की ''काँग्रेसमुक्त भारताचं स्वप्न बघणारे नरेंद्र मोदी गेली ११ वर्षे सगळ्या राष्ट्रीय तपास यंत्रणा लावून आणि संविधानिक संस्था वापरून, व्होट चोरी करून अयशस्वी ठरले. काँग्रेस पक्ष १४० वर्षे सगळी वादळे सहन करुन टिकून राहिला आहे.

सावंत म्हणाले, ''आम्ही इंग्रजांच्या विरुद्ध लढताना घाबरलो नाही तर तुम्ही कोण आलात? काँग्रेस विभाजित करण्याचा कितीही प्रयत्न करा. काँग्रेस ही जनचळवळ आहे. समुद्रात काठी मारल्याने समुद्र विभाजित होत नाही. बरं, इतिहासात डोकवा मुस्लीम लीगविरोधात काँग्रेस लढली. तुमच्या पूर्वजांनी त्यांच्यासमवेत सरकारे स्थापन केली होती. इतके तुमचे मुस्लिम लीगवर प्रेम होते. तुम्ही संविधान व लोकशाही संपवण्याचा प्रयत्न करत रहा, आम्ही राहुल गांधींच्या नेतृत्वाखाली संविधानाच्या व लोकशाहीच्या संरक्षणासाठी प्राणाची बाजी लावत राहू.''

## महाराष्ट्र जलसंपदा विभाग भारतात प्रथम

माध्यमांशी बोलतांना मंत्री विखे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे २०२४ साली जलसंपदा विभागाची जबाबदारी होती. त्यांच्या कार्यकाळात विभागाने राज्याच्या जलव्यवस्थापन आणि सिंचन क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीमुळे महाराष्ट्र राज्याला हा सन्मान प्राप्त झाला आहे.

जलसंपदा विभागाच्या यशात मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून होत असलेले नियोजन तसेच अतिशय पारदर्शकता, तांत्रिक सुधारणा आणि निर्धारीत वेळेत प्रकल्प पूर्ण करण्यावर विशेष भर दिला आहे. घरण सुरक्षा, जलसंवर्धन सिंचन प्रकल्पांना गती आणि जलस्रोतांचा योग्य वापर यासर्व कामासाठी घेतलेल्या निर्णयाचे प्रतिबिंब या पुरस्कारा मागे असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले. महायुती सरकाच्या माध्यमातून सिंचन सुधारणा कार्यक्रमात सर्व प्रकल्पांची काम निर्धारीत वेळेत पूर्ण करण्यासाठी विभाग प्रयत्न करीत असून, विश्वनेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महत्त्वाकांक्षी आशा नदीजोड प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सुरू आहे. केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाने विभागाचा गौरव म्हणजे दुष्काळमुक्त महाराष्ट्राच्या संकल्पनेला मिळालेले पाठबळ असून, विभागातील सर्व अधिकारी अभियंते आणि कर्मचारी यांचेही मोठे योगदान पुरस्कार मिळण्यात असल्याचा उल्लेख मंत्री विखे पाटील यांनी आवर्जून केला.

## केंद्र सरकार बँकांचे विलिनीकरण करण्याच्या तयारीत

एकाच प्रकारच्या कामाच्या कर्मचाऱ्यांची संख्या वाढल्यामुळे संभाव्य चार प्रमुख बँका... स्टेट बँक ऑफ इंडिया केनरा बैंक पंजाब नॅशनल बैंक बैंक ऑफ बडोदा या बँकांच्या पदोन्नती, बदली आणि पगारवाढीवर परिणाम होऊ शकतो. काही कर्मचाऱ्यांना इतर राज्यात ट्रान्सफर होण्याची वेळ येऊ शकते, तर नव्या भरतीच्या संधींवरही मर्यादा येण्याची शक्यता आहे. विलिनीकरणानंतर ग्राहकांना नवीन पासबुक, चेकबुक आणि खाते क्रमांक मिळू शकतो. मात्र ठेवी, व्याजदर, एफडी किंवा कर्जावर कोणताही आर्थिक बदल होणार नाही.

शाखांचा पत्ता किंवा नाव बदलल्यास ग्राहकांना नवीन चेकबुक किंवा पासबुकसाठी शाखेत जावे लागेल.

## दिल्लीतील लाल किल्ला मेट्रो स्टेशनजवळ स्फोट

तपास यंत्रणेकडे सोपवण्यात आला आहे.

तपास यंत्रणांच्या हाती लागलेल्या माहितीनुसार, या स्फोटामागील मुख्य सूत्रधार डॉ. उमर उन नबी असल्याचे उघड झाले आहे. नबी हा जैश-ए-मोहम्मद (गशच्) या दहशतवादी मॉड्यूलशी संबंधित होता आणि तो तुर्कस्तानस्थित 'उकासा' नावाच्या हँडलरच्या संपर्कात होता. स्फोटाचा कट हा जानेवारी महिन्यापासून शिजत होता आणि त्यासाठी लाल किल्ल्याची रेकीही करण्यात आली होती. या स्फोटाच्या तपासात आतापर्यंतचे सर्वात मोठे यश म्हणून, दिल्ली पोलिसांनी संशयित आरोपी उमर उन नबी याच्याशी संबंधित असलेली लाल रंगाची फोर्ड इकोस्पोर्ट डणत कार हरियाणातील फरीदाबादजवळ सापडली आहे.

| | | |
|---|---|---|
| चिमण्या चिवचिवल्या | - मा.रा.लामखडे | रु. १०० |
| टिकली तर टिकली | - श्रद्धा बेलसरे | रु. १५० |
| रानसय | - भास्कर चंदनशीव | रु. २२५ |
| निःशब्द कोलाहल | - धनंजय गोवर्धने | रु. ११० |
| आधुनिक मराठी गेय कविता | - डॉ.सयाजीराजे मोकाशी | रु. १७५ |
| मुके जाते गाणे गाते | - विनायक बंगाळ | रु. ९० |
| कानडी मुलखातील मुशाफिरी (प्रवास वर्णन) | - मा.रा.लामखडे | रु. २२० |
| पैंजणांचे झाड | - सिसिलिया कार्व्हालो | रु. १५० |
| काळोखाला दूर सारून | - प्रतिभा जाधव | रु. १४० |
| साळुंकीची सावली | - महावीर जोंधळे | रु. १८० |
| उत्कर्षवाटा (पुणे विद्यापीठ) | - संपा.डॉ.लांडगे, डॉ.रोंगटे, डॉ.सांगळे | रु. १२० |
| रंग जीवनाचे | - बबन काकडे | रु. २५० |
| च्यामारी | - डॉ.प्रमोद काळे | रु. १८० |
| कुब्र | - सत्यजित पाटील | रु. २३० |

**नाटक/एकांकिका/चित्रपट विषयक**

| | | |
|---|---|---|
| तुंबारा | - सयाजी शिंदे | रु. २५० |
| तृतीय रत्न (नाटक) (जळगाव विद्या. अभ्यासक्रमात समाविष्ट) | - ले.जोतिराव फुले, संपा. दत्ता भगत | रु. २२५ |
| माझं घर | - जयंत पवार | रु. १६० |
| जनक | - शार्दुल सराफ | रु. १५० |
| हंडाभर चांदण्या (संहिता आणि लेख) (पुणे विद्यापीठ) | - दत्ता पाटील/ संपा.सतिश बडवे | रु. १५० |
| राहिले दूर घर माझे | - शफाअत खान | रु. १४० |
| चौक | - मकरंद साठे | रु. १२० |
| मंथरक आणि इतर एकांकिका | - जयसिंग पाटील | रु. ९० |
| जाता नाही जात | - सिद्धार्थ तांबे | रु. १५० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| प्रत्ययकारी परदेशी सिनेमा | - उदय कुलकर्णी | रु. ६५० |

**चरित्र/आत्मचरित्र**

| | | |
|---|---|---|
| श्री.संत चोखामेळा : चरित्र आणि अभंग | - संपा.स.भा.कदम, प्रस्ता.भालचंद्र नेमाडे | रु. १६० |
| जिजी (शेतकरी आईची जीवनगाथा) | - प्रा.सौ.लिला जंजिरे | रु. २०० |
| कोकरूड ते बर्मिंगहॅम | - प्रा.अब्दुलगनी अत्तार | रु. ३७५ |
| सुंबरान | - दिनकर यमनाजी शेलार | रु. २५० |
| पंख गळून गेले तरी | - सुधीर देवरे | रु. ८० |
| स्त्रीरत्न क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चोले | रु. ७५ |
| मलिक अंबर | - वि.स.वाकसकर | रु. १०० |
| लावणी सम्राज्ञी (यमुनाबाई वाईकर यांचे चरित्र) | - प्रभाकर ओव्हाळ | रु. २५० |
| कांताबाई सातारकर | - संतोष खेडलेकर | रु. २०० |
| स्वातंत्र्यसूर्य महाराणा प्रताप | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| संत मीराबाई | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| मी तो हमाल | - आप्पा कोरपे | रु. १५० |
| प्रकाशाची बेटे | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २२० |

**कविता संग्रह**

| | | |
|---|---|---|
| बालकवींच्या निवडक कविता | - संपा.ना.धों.महानार | रु. ११५ |
| वसा | - वसंत सावंत | रु. ७५ |
| सुमती लांडे : समग्र कविता | - संपादक : कविता मुरुमकर/ सुमती लांडे | रु. ५९९ |
| कमळकाचा | - सुमती लांडे, चित्रप्रत्यय- प्रभाकर कोलते | रु. २०० |
| वाहते अंतर | - सुमती लांडे | रु. ९० |
| तुकाराम : अहिराणीत निरुपण | - डॉ.एस.के.पाटील | रु. ५२५ |
| बोलावे ते आम्ही (साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त) | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| येरू म्हणे | - प्रवीण बांदेकर | रु. १०० |
| बोलावे ते आम्ही | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| ऋतुपर्णाच्या कविता | - जितेंद्र कुंवर | रु. ३०० |
| आवानओल | - अजय कांडर | रु. १०० |
| प्रलयानंतरची तळटीप | - सुचिता खल्लाळ | रु. २२५ |
| दंडविधान | - मनोज सुरेंद्र पाठक | रु. २७० |
| एक शून्य प्रतिक्रिया | - व्यंकटेश चौधरी | रु. २०० |
| माणूस उकरून काढावा लागतोय | - सिसिलिया कार्व्हालो | रु. २०० |
| ज्याचा त्याचा चांदवा | - अंजली ढमाळ | रु. २२० |
| दुभंगवाणी | - डॉ.नंदू मुलमुले | रु. १५० |
| गरम झळा आणि संभ्रमाची फळे | - पोपट सातपुते | रु. १०० |
| भुईशास्त्र (साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त) | - ऐश्वर्य पाटेकर | रु. २२० |
| भुई तापाचे बळी | - प्रभाकर महाजन | रु. १६० |
| हिन्दोल | - संध्या शहापुरे | रु. २५० |
| अस्वस्थ क्षणांचे पाश | - समाधान महाजन | रु. १२० |
| विसविशीत जगण्याच्या उंबरठ्यावरून | - विलास माळी | रु. २०० |
| तहानलेले पाणी | - मारुती सावंत | रु. १२० |
| पाच बिघे | - लक्ष्मण बारहाते | रु. ८० |
| रक्तसेतू | - सुखदेव ढाणके | रु. १०० |
| हुर्दुक | - सुखदेव ढाणके | रु. ९० |
| ओले अथांग श्वास | - रामकली पावसकर | रु. १०० |
| स्त्री कुसाच्या कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १२५ |
| कुणब्याची कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १३० |
| बळीचं जिणं | - दयाराम गिलाणकर | रु. १०० |
| कविता दिक्षेच्या | - महेंद्र भास्कर पाटील | रु. ८० |
| मेघवृष्टी | - जयराम खेडेकर | रु. १०० |
| विलग | - गणेश आत्माराम वसईकर | रु. ९० |
| वादळवाट | - वंदना महाजन | रु. १५० |
| जिवन नरहची आसामी कविता | - अनु.शोभा नाईक | रु. ७५ |
| ब्रम्हसोपान | - रेषा आकोटकर | रु. ९० |
| एक टुकडा आसमाँ का | - विश्वजीत तुळजापूकर | रु. ७५ |
| एका गोरज घडीला (O.P) | - अरुण सांगोळे | रु. ७५ |
| नांगरून पडलेलं शतक | - रमेश चिल्ले | रु. ८० |
| अनुकार | - जयश्री पाठक | रु. ९० |
| खानदानी | भगवान देशमुख | रु. ८० |
| जगण्याच्या कोलाहलात | - गणेश मरकड | रु. २०० |
| आयडियल स्टेटच्या हद्दीबाहेरून | - सिद्धार्थ तांबे | रु. ७० |
| ओळींनी अंबर व्हावे | - रमेश मगरे | रु. ११० |
| निरिच्छ नभ | - विनायक त्र्यं.पाटील | रु. ७० |
| रूप-अरूपाचे | - अशोक सोनवणे | रु. १०० |
| भोग सरू दे उन्हाचा | - कैलास दौंड | रु. ९० |
| इंद्रधनूच्या कमानीवर | - राजेश जाधव | रु. १०० |
| अक्षरऋतू | - प्रमोद जोशी | रु. १०० |
| रानभरारी | - गुंफा कोकाटे | रु. ८० |
| पाऊल खुणा | - संजीव दुधाट | रु. ८० |
| बाणगंगेच्या तिरी | - डॉ.मधुकर कवडे | रु. ९० |
| जन्मांतर | - शुभम अनिल दुरगुडे | रु. १२० |
| निवडक कविता | - संपा.प्रा.डॉ.वसंत शेकडे | रु. १०० |
| फिर्याद | - हिरा बनसोडे | रु. १०० |
| दाहगाथा | - कैलास सलादे | रु. १२० |
| अकुतोभय | - निलेश शेळके | रु. १४० |
| संदर्भासहित स्पष्टीकरण | - इरावती इंगवले-यादव | रु. १२० |
| सूर्य गेला नाही अजून अस्ताला | - विनायक हिरवे | रु. १५० |
| जखमी पावलांचे ठसे | - कैलास जिजाबाई चावडे | रु. १२० |
| केकतीची फुले | - ल.सि.जाधव | रु. १०० |
| काव्यबंध (मुंबई विद्यापीठ) | - संपा.डॉ.नीलकंठ शेरे/डॉ. नानासाहेब यादव/ डॉ.जगदिश राणे | रु. २०० |
| मी मातीचे फूल | - मीनल येवले | रु. २०० |
| ऐन पस्तिशीत | - दिलीप वीरखेडे | रु. ८० |
| काव्यभान | - रविंद्र कांबळे | रु. १०० |
| धुनी (O.P) | - सुरेश सावंत | रु. २०० |
| काहीच नष्ट होत नसतं | - विजय चोरमारे | रु. १६० |
| गाव हाकेच्या अंतरावर (O.P) | - जगदीश कदम | रु. १२० |
| माणूसनामा | - कैलास पगारे | रु. १२० |
| साकल्याच्या प्रदेशात | - डॉ.सिसिलिया कार्व्हालो, डॉ.धनाजी गुरव, डॉ.निलकंठ शेरे | रु. १५० |
| अधांतर अंधारात | - महेश केळुसकर | रु. २२० |
| आत्मपीठ | - मंदाकिनी पाटील | रु. २६० |
| पद्म गोपाळ | - सौ.निर्मला काळे | रु. ३०० |
| काव्यरंग | - डॉ.आरेकर, डॉ.यादव, डॉ.राणे | रु. २२० |
| हंबरवाटा | - संतोष आळंजकर | रु. २५० |
| दंडविधान | - मनोज पाठक | रु. २७० |
| कथार्सिस | - सारिका उबाळे | रु. ३४० |

**चरित्र**

| | | |
|---|---|---|
| संत गाडगेबाबा | - विजय पाटील | रु. ३० |
| बहिणाबाई चौधरी | - मृण्मयी पाटील | रु. ३० |
| अहिल्याबाई होळकर | - विजया पाटील | रु. ३० |
| स्त्रीरत्न सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चौले | रु. ७५ |
| अहिल्याबाई होळकर | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| बहिणाबाई चौधरी : चरित्र आणि निवडक कविता | - सुमती पाटील | रु. ५० |
| डॉ.अब्दुल कलाम : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| इंदिरा गांधी : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| पंडित जवाहरलाल नेहरु : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| महात्मा ज्योतिबा फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| राष्ट्रपिता महात्मा गांधी | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| सावित्रीबाई फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| सम्राट अशोक : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| शाहू महाराज : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| जे.आर.डी.टाटा | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| यशस्वी भारतीय महिला (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| झाशीची राणी : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. १०० |
| पंडित दीनदयाळ उपाध्याय | - सुमती पाटील | रु. ५० |

**सामान्यज्ञान**

| | | |
|---|---|---|
| आधुनिक बेकरी व्यवसाय तंत्रज्ञान | - यू.डी.चव्हाण | रु. १००० |

**शैक्षणिक/बाल/कुमार/प्रौढ साक्षर/इत्यादी**

| | | |
|---|---|---|
| निसर्गाकडे चला | - डॉ.गजानन पाटील | रु. १४० |
| तंत्र तणावमुक्तीचे | - डॉ.गजानन पाटील | रु. ४० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग १ | - डॉ.गजानन पाटील | रु. ६० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग २ | - डॉ.गजानन पाटील | रु. १२५ |
| मानसिक तणावमुक्त अध्यापन प्रतिमान (O.P) | - डॉ.गजानन पाटील | रु. १०० |
| पर्यावरण प्रकल्प कार्य (O.P) | - डॉ.तरुजा भोसले | रु. २५० |
| शालेय ग्रंथालय व्यवस्थापन | - डॉ.सी.श्री.पाटील | रु. १५० |
| शब्दसंपदा : निवडक भाषणे | - डॉ.भगवान सावंत | रु. ८० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| आठवणी यदुनाथांच्या | - संपा.डॉ.प.शं.झेंडे | रु. ७० |
| योगासनांची ओळख | - डॉ.प.शं.झेंडे | रु. ४५ |
| अध्यात्म, विज्ञान व संस्कार मूल्य | - दत्तात्रय चिताळकर | रु. १०० |
| गीतइसापनीती | - उषा परब | रु. ८० |
| करामती प्रकाश | - विजय नांगरे | रु. ५० |
| ओंजळीतील मोती | - प्रमिला हनुमंतराव रासकर | रु. १२० |
| एड्स | - विजया पाटील | रु. १५ |
| चिकुनगुणिया | - डॉ.एस.के.पाटील | रु. १५ |
| नखे कापा - निरोगी राहा | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. ३५ |
| खानदेशी गाव | - आबा महाजन | रु. १८० |
| नखपुराण | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. १५ |
| परोपकारी शंकर | - विजय नांगरे | रु. १५ |
| बहुगुणी तुळस | - डॉ.मंगला काजळे | रु. १५ |
| आपला नांदेड जिल्हा | - सुमती पाटील | रु. ३० |
| मालगुंडचा सिद्धू | - आनंद वाघ | रु. ३०० |
| बालसंस्कार | - ताई पवार | रु. १०० |
| आम्ही भी घडणार | - ताई पवार | रु. ११५ |
| विज्ञान कोडे | - ताई पवार | रु. १२० |
| दिशा नवोपक्रमाची | - ताई पवार | रु. १४० |
| श्री गणेशा शिक्षणाचा | - ताई पवार | रु. ९० |
| छत्रपती शिवाजी राजेभोसले यांचा पवाडा | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १०० |
| गुलामगिरी | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| शेतकऱ्याचा असूड | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| योग - सर्वांसाठी | - आनंद वाघ | रु. २५० |
| योगा - खेळ, छंद आणि संस्कार | - आनंद वाघ | रु. २५० |
| कोवीड १९ - अकल्पीत चकवा | - आनंद वाघ | रु. २०० |
| स्त्री - पुरुष तुलना | - ताराबाई शिंदे - संपा.महेंद्र मुंजाळ | रु. १२५ |
| महाराष्ट्रातील समाजसुधारक | - अे. देशमुख | रु. ८० |

**कृषि विषयक पुस्तके**

**डॉ. यू. डी. चव्हाण / डॉ. पी. जी. पाटील**

| | |
|---|---|
| मधुमक्षिका पालन - आळींबी लागवड (शेतीतील जोडधंदे) | रु. ७२० |
| पेपेन उद्योग - रेशीम उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| कुक्कुट पालन-ससे पालन (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| शेळी पालन - मेंढी पालन (शेतीतील जोडधंदे) | रु. ७१० |
| पशुपालन व दुग्धव्यवसाय - गांडुळ खत निर्मिती प्रकल्प | रु. ७०० |
| वराह पालन - मत्स्य उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| महिलांना करता येण्यासारखे उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ६९० |
| कृषि अवजारे व यंत्राचा उपयोग (शेतीतील जोडधंदे) | रु. २६० |
| मसाला प्रक्रिया उद्योग | रु. ५७० |
| मत्स्य प्रक्रिया उद्योग | रु. ७०० |
| आंबा-केळी-द्राक्ष प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| अननस-चिकू-पेरु प्रक्रिया उद्योग | रु. ६३० |
| अंजिर-चिंच-जांभूळ-पपई-स्ट्रॉबेरी प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| आवळा-डाळींब-बोर-प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| दूध व दुग्धजन्य पदार्थ | रु. ६५० |
| फळभाज्या प्रक्रिया उद्योग | रु. ६४० |
| काजू-कवठ-फालसा-कृष्णफळ-करवंद-सफरचंद-कोकम-फणस-उंबर-लिची प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| लिंबूवर्गीय फळे प्रक्रिया उद्योग | रु. ६३० |
| मांस-मटन-अंडी प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| टोमॅटो-बटाटा-कांदा-लसून-प्रक्रिया उद्योग | रु. ६१० |
| तृणधान्य-कडधान्य-गळीतधान्य प्रक्रिया उद्योग | रु. ७१० |
| वाईन उद्योग | रु. ७५० |
| कृषि क्षेत्रातील कृषि उद्योग | रु. ५५० |
| कृषि प्रक्रिया उद्योग कोश | रु. २००० |
| अक्षय उर्जा | रु. १७० |

**शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर यांची महत्त्वाची पुस्तके मागविण्यासाठी खालील नंबरवर संपर्क करा – मो. ९०११२०१४१४ / ९८२२५२५४४४**

CMS
CREATIK
MULTI SERVICES PVT LTD



Discover Pustakvari : The Ultimate eBook Platform
State-of-the-Art eBook Readers
Advanced Security and Technology
Intelligent Search and Realistic Viewing Experience
Expansive Content Library
Global Accessibility and Multi-Publisher Platform
Tailored Solutions for Institutes and Libraries
Interactive Learning with General Knowledge Software
Smart Recommendations and User Customization



Contact US
Email : creatikpvtltd44@gmail.com
Contact : +91 22 3599 9192 | +91 9822525444
Website : creatikmultiservices.com

Digital India Vision India MAKE IN INDIA MSME

Gut No. 125, Ranjankhol, Tal. Rahata, Dist. Ahmednagar 413709

# कुंभमेळ्यासाठी ६ हजार कोटी रुपयांच्या विकास कामांचा प्रारंभ

## सिंहस्थ कुंभमेळा-२०२७, विविध विकास कामांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते भूमीपूजन




**नाशिक :** नाशिक आणि त्र्यंबकेश्वर परिसरात सुमारे २५ हजार कोटी रुपये खर्च करून येत्या काळात करण्यात येणारी पायाभूत सुविधांची कामं पुढची २५ वर्ष टिकतील अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली. नाशिकमध्ये पुढच्या वर्षीपासून सुरू होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी ६ हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास कामांचा प्रारंभ आज मुख्यमंत्री फडनवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज झाला. त्यावेळी ते बोलत होते.

### २५ हजार कोटी रुपये खर्च करणार

कुंभमेळ्याच्या काम मिधून नाशिक आधुनिक होणार आहे. तसेच तीर्थक्षेत्र आणि पर्यटन क्षेत्र म्हणून या शहराचा विकास करण्यात येणार असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. यावेळी त्यांनी या विकासकामांविषयीची माहिती दिली. नाशिकचा कुंभमेळा स्वच्छ सुंदर आणि सुरक्षित व्हावा यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न सुरू आहेत, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळीम्हणाले. कुंभमेळ्यासाठी लागणाऱ्या साधुग्रामच्या जागेचं कायमस्वरूपी भूसंपादन करायला प्राधान्य देण्यात येणार असल्याचंही शिंदे आपल्या भाषणात म्हणाले. या कार्यक्रमाला कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे तसंच अन्य मान्यवरही उपस्थित होते. या कार्यक्रमापूर्वी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी रामकुंड परिसरात सुरू असलेल्या कामांची पाहणी केली तसंच राम काल पथ या प्रकल्पाचे भूमिपूजन केले. यानंतर नाशिक जिल्हा परिषदेच्या नवीन इमारतीचे उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले.

### काही चुकले तर सांभाळून घ्यावे...

यंदाचा कुंभमेळा हा प्रयागराजच्या तुलनेत आव्हानात्मक आहे. भाविकांना सर्वोत्तम सेवा मिळाव्या यासाठी शासन कटिबध्द असून माध्यमे तसेच नेत्यांनी कोणत्या ठेकेदाराला काम दिले, याकडे लक्ष देऊ नये. सर्व कामे पारदर्शक पध्दतीने होतील, काही चुकले तर साधू महंतांनी सांभाळून घ्यावे, चुका दुरूस्त केल्या जातील.

**- देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

# नवले ब्रिजवर अपघात; आठ जणांचा मृत्यू

**पुणे :** मुंबई-बेंगळुरु महामार्गावरील नवीन कात्रज बोगद्यापुढे दरी पूल ते नवले पूल दरम्यानच्या उतारावर गुरुवारी सायंकाळी मालवाहू ट्रकने आठ ते दहा वाहनांना ठोकरून एका कारला जोरदार धडक दिली. ही कार फरफटत नेऊन ट्रकने आणखी एका ट्रकला धडक दिली. या दोन्ही ट्रकच्या मध्ये अडकलेल्या कारचा अक्षरशः चेंदामेंदा होऊन आग लागल्याने स्फोट झाला. या दुर्घटनेत कारमधील प्रवाशांसह एकूण आठ जणांचा होरपळून मृत्यू झाला. मृतांमध्ये दोन महिला, एक बाळ आणि चार पुरुषांचा समावेश आहे.

सायंकाळी५.४० मिनिटांनी अग्निशमन दलाच्या नियंत्रण कक्षात एका व्यक्तीचा फोन आला. त्याने नवले पुलाजवळ दोन ते तीन वाहनांचा अपघात झाला असून, त्यांना आग लागली असल्याचे सांगितले. अग्निशमन दलाकडून तत्काळ सिंहगड रोड अग्निशमन केंद्राची गाडी घटनास्थळाकडे सोडण्यात आली. गाड्या घटनास्थळी पोहोचल्यानंतर एक कारमध्ये व्यक्ती अकडल्याचे समजले आणि धावाधाव उडाली. सर्वच यंत्रणा कामाला लागल्या.

अग्निशमन नियंत्रण कक्षातून सिंहगड रोड केंद्राची पहिली गाडी पाठवली होती. ती साधारण ५.४८ वाजता घटनास्थळी दाखल झाली. त्यानंतर एका मिनिटात नवले आणि 'पीएमआरडीए' अग्निशमन दलाच्या दोन गाड्या दाखल झाला. अग्निशमन दलाच्या जवानांनी प्रथम पाण्याचा मारा करून आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला. आग आटोक्यात आणल्यानंतर ट्रकखाली कार दबल्याचे दिसून आले. क्रेन मागवून वाहने हटवण्यात आली. अपघातात कारचा चेंदामेंदा झाला होता. रेस्क्यू व्हॅनमधील कटर, स्प्रेडर व इतर साहित्याच्या मदतीने कारमधील मृतदेह काढण्यात आले.



विविध अपघातांत मृत्यू झालेल्यांची वाहतूक यापूर्वी केली आहे. मात्र, या अपघातात मृतांची अवस्था पाहून खूप दुःख झाले. अशी घटना पुन्हा होऊ नये, हीच प्रार्थना.

**- सचिन मोरे, रुग्णवाहिका चालक**

# बिबट्या दिसताच ऑन द स्पॉट शूट करा

### वनमंत्री गणेश नाईक यांचे आदेश

**पुणे :** राज्यात बिबट्यांचा संचार मोठ्या प्रमाणावर वाढला असून, माणसांवर आणि जनावरांवर हल्ल्याच्या घटना वाढल्या आहेत. यांत आतापर्यंत अनेकांचा मृत्यू झाला आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी जिथे बिबट्या दिसेल तिथे ऑन द स्पॉट शूट करा असे आदेश वनविभागाला दिले आहेत.

पिंपरखेड-शिरुर भागात अलिकडच्या काही दिवसांत तीन ग्रामस्थांचा बिबट्याच्या हल्लूयात मृत्यू झाला आहे. तसेच कोल्हापूर, मराठवाडा, अहिल्यानगर या भागातही बिबट्यांचा वावर वाढल्याने लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयाकरिता ग्रंथनिवड समितीने शिफारस केलेल्या आणि ग्रंथालय संचलनालय, नगर भवन, मुंबई-२३ यांनी प्रकाशित केलेल्या यादीतील पुस्तकांची नावे

**सन २०२२**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | १. | अहमदनगर जिल्हा धार्मिक आणि निसर्ग पर्यटन / दत्ता केंगे | १८०/- |
| २. | २. | नाशिक जिल्हा धार्मिक आणि निसर्ग पर्यटन / दत्ता केंगे | १३०/- |
| ३. | ३. | पालघर जिल्हा धार्मिक आणि निसर्ग पर्यटन / दत्ता केंगे | ९०/- |
| ४. | ४. | पुणे जिल्हा धार्मिक आणि निसर्ग पर्यटन / दत्ता केंगे | १८०/- |
| ५. | ५. | सिंधुदुर्ग जिल्हा धार्मिक आणि निसर्ग पर्यटन / दत्ता केंगे | १३०/- |
| ६. | ६. | सोलापूर जिल्हा धार्मिक आणि निसर्ग पर्यटन / दत्ता केंगे | १२०/- |
| ७. | २६. | अपंग नव्हे अभंग / पुंडलिक गवांदे | १६०/- |
| ८. | २७. | स्वातंत्र्य संग्रामाच्या शौर्यकथा / विजय नांगरे | २२०/- |
| ९. | २८. | माझे दुसरे सुरक्षा पुस्तक / आनंद वाघ | २२०/- |
| १०. | २९. | माझे तिसरे सुरक्षा पुस्तक / आनंद वाघ | २२०/- |
| ११. | ३०. | माझे चौथे सुरक्षा पुस्तक / आनंद वाघ | २२०/- |
| १२. | ३१. | माझे पाचवे सुरक्षा पुस्तक / आनंद वाघ | २२०/- |
| १३. | २१०. | अक्षय उर्जा माहिती, तंत्रज्ञान आणि अर्थशास्त्र / वैभवकुमार शिंदे | १७०/- |
| १४. | २११. | अभ्यासाची खोली / दत्ता केंगे | ७०/- |
| १५. | २१२. | मला मोठ्ठं व्हायचंय / दत्ता केंगे | ८०/- |
| १६. | २४५. | आम्ही छोटे शेतकरी शेतीला जोडधंदे / एस. के. पाटील | ८०/- |
| १७. | २४६. | आफ्रिकन लोककथा अनांसीच्या कथा / स्मिता मुजुमदार | ८०/- |
| १८. | २४७. | कित्तूरची राणी चेन्नम्मा / स्मिता मुजुमदार | ८०/- |
| १९. | २४८. | पुण्यश्लोक राणी अहिल्याबाई होळकर / स्मिता मुजुमदार | ८०/- |
| २०. | ३५५. | तुकाराम : अहिराणीत निरुपण / एस. के. पाटील | ५२५/- |
| २१. | ३५६. | कादंबरीतील नवता / इंद्रजित वीर | ५५०/- |
| २२. | ३५७. | लोकसाहित्याची चिकित्सा / नवनाथ शिंदे | ६००/- |
| २३. | ३५८. | अधोरेखित अक्षरे / सुरेखा सबनीस | ३५०/- |
| २४. | ३५९. | हिन्दोल / संध्या शहापुरे | २५०/- |
| २५. | ३६०. | बारदाणा / संजय जगताप | २४०/- |
| २६. | ३६१. | सामूहिक सक्षमीकरणातून ग्रामविकास / प्राजक्ता लवंगारे | २००/- |
| २७. | ३८२. | निर्धार प्लास्टिक प्रदूषण मुक्तीचा / पुंडलिक गवांदे | २००/- |
| २८. | ३८३. | प्राण्यांचे संदेश / पुंडलिक गवांदे | २२०/- |
| २९. | ३८४. | विज्ञान कोडे / ताई पवार | २४०/- |
| ३०. | ५२५. | गोतावळा व्यक्तिचित्रे / श्रद्धा बेलसरे | २२०/- |

**सन २०२२**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | ९८५ | माझं घर / जयंत पवार | रु. १६० |
| २. | ४२० | पक्षांची ओळख / पुंडलिक गवांदे | रु. २५० |
| ३. | ४१० | विज्ञान कोडे / ताई पवार | रु. १४० |
| ४. | ३९१ | अक्षय उर्जा / वैभवकुमार शिंदे | रु. १७० |
| ४. | ४२४ | बहुगुणी वनस्पती / हरिपाद आजरेकर | रु. १०० |
| ५. | ६७८ | साहित्य आणि अस्तित्वभान भाग - २ / दिलीप चित्रे | रु. १००० |
| ६. | ६९५ | भारतीय साहित्यशास्त्र सिद्धांत आणि समिक्षा / भरतकुमार भालेराव | रु. २०० |
| ७. | ४१८ | कुब्र / सत्यजीत पाटील | रु. २३० |
| ८. | १११३ | डिळी / सुचिता खल्लाळ | रु. २९० |

**सन २०२१**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | २३८३ | झाडाची गोष्ट / शालमल लांडे | रु. ६० |
| २. | २२२८ | मी अब्दुल कलाम / मृण्मयी पाटील | रु. ६५ |
| ३. | २२३० | आनंद गाणी / स्नेहा पाटील | रु. ६० |
| ४. | २२५४ | अंतराळाचे स्वप्न व इतर गोष्टी / संज्यात बानुबाकोडे | रु. ६५ |
| ५. | २३०३ | बी ची गोष्ट / सुनिल भोंडगे | रु. ५० |
| ६. | ३६५ | मानवी इंजिन आणि त्याचे इंधन / यु. डी. चव्हाण | रु. ६७५ |
| ७. | १२७८ | तिचा अवकाश / वंदना महाजन | रु. ३०० |
| ८. | २११४ | बेस्ट फ्रेंड / विशाल तायडे | रु. ९० |
| ९. | ७२० | स्त्री कुसाच्या कविता / लक्ष्मण महाडिक | रु. १२५ |
| १०. | ७६६ | नवसंवेदन / नीळकंठ शेरे | रु. २७० |

**सन २०२०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | ३६८ | योग खेळ, छंद आणि संस्कार/आनंद वाघ | रु. २५० |
| २. | ३९८ | जल उर्जा/संदीप लांडे | रु. १०० |
| ३. | ४४५ | स्त्रीवाद आणि १९७५ नंतरची मराठीतील आत्मचरित्रे/भरतकुमार भालेराव | रु. ७०० |
| ४. | ४८४ | काव्याचा भावार्थ/नीलिमा गुंडी | रु. ३७० |
| ५. | ५०२ | ज्याचा त्याचा चांदवा/अंजली ढमाळ | रु. २२० |
| ६. | ५३२ | दंडविधान/मनोज पाठक | रु. २७० |
| ७. | ५५० | जगण्याच्या कोलाहलात/गणेश मरकड | रु. २०० |
| ८. | ६१३ | कोयतूर/विनोद कुमरे | रु. ३२० |
| ९. | ६९७ | आहेच वेगळी/राजेंद्र मलोसे | रु. ४०० |
| १०. | ९९६ | रंग जीवनाचे/बबन काकडे | रु. २५० |
| ११. | १४८६ | निसर्गाचे संवर्धन का करावे?/अभास भारध्वाज | रु. १७५ |
| १२. | १५१० | आपले हरित घर/संदीप लांडे | रु. १०० |
| १३. | १५१६ | जग बदलणारे ५० शोध/आनंद वाघ | रु. १०० |
| १४. | १५२१ | चला पावसाच्या पाण्याची बचत करू या/संदीप लांडे | रु. १२५ |
| १५. | १५१५ | पोक्सो कायद्याचे स्वरुप आणि बालकांचे संरक्षण /सुमती लांडे | रु. २५ |
| १६. | १६५२ | स्त्रीवाद आणि १९७५ नंतरची मराठीतील आत्मचरित्रे/भरतकुमार भालेराव | रु. ७०० |

**सन २०१७**

| | | | |
|---|---|---|---|
| १७. | १०२ | पोलीस भरती मार्गदर्शक व ५० प्रश्नसंच | १८०.०० |
| १८. | ५२४ | मराठी वाङ्मय प्रकार : स्वरुप, संकल्पना व वाटचाल | ४००.०० |
| १९. | ५७३ | मराठी गझल : प्रवाह आणि प्रवृत्ती | २६०.०० |
| २०. | ६१७ | दुभंगवाणी | १५०.०० |

**सन २०१६/१७**

| | | | |
|---|---|---|---|
| २१. | ११ | देशमुख धनंजय/ पंचायत राज | २००.०० |
| २२. | १२ | धनंजय देशमुख / सामान्य विज्ञान | २५०.०० |
| २३. | ४७० | दिलीप धोंडगे /हरवले गाव | २५०.०० |
| २४. | ५९१ | सूर्यवंशी अभिमन्यू /स्वातंत्र्यसूर्य महाराणा प्रताप | २००.०० |
| २५. | ३४८ | अडसूळ श्रीकृष्ण/गोमंतकीय साहित्य | २५०.०० |
| २६. | ३७४ | शिखरे गोकुळ/साहित्य आणि समाज एक आकलन | १८०.०० |
| २७. | ३९५ | कांबळे रविंद्र/ काव्यभाव | १००.०० |
| २८. | ४५६ | हिरवे विनायक/ सूर्य गेला नाही अजून अस्ताला | १५०.०० |
| २९. | ६४८ | कार्व्हालो सिसिलिया/ पैंजणांचे झाड | १५०.०० |
| ३०. | ६८९ | जोंधळे महावीर/ साळुंकीची सावली | १८०.०० |
| ३१. | ७३७ | चावडे कैलास/जखमी पावलांचे ठसे | १२०.०० |
| ३२. | ८२३ | मुलमुले नंदू/ दुभंगवाणी | १५०.०० |

**सन २०१५**

| | | | |
|---|---|---|---|
| ३३. | १४ | जोशी स्मिता /पोलीस भरती मार्गदर्शन | १५०.०० |
| ३४. | ३८१ | लिला गोविलकर /मराठीचे व्याकरण | ३००.०० |
| ३५. | ३८४ | नगरकर शेकडे /व्यावहारिक मराठी | ८०.०० |
| ३६. | ५२३ | खल्लाळ सुचिता/स्त्री लिखित साहित्य संदर्भ आणि चिकित्सा | २६०.०० |
| ३७. | ५३० | घोणसे शामा /मराठी विरशैव वाङमयःएक अवलोकन | १५०.०० |
| ३८. | ५५० | पाटील आशुतोष /स्त्री लिखित साहित्य संदर्भ आणि चिकित्सा | २६०.०० |
| ३९. | ५७१ | वाघमारे राम/समकालिन कादंबरीकार नेमाडे आणि पठारे | ४८०.०० |
| ४०. | ५७७ | शिंदे विश्वनाथ /पारंपारिक मराठी तमाशा आणि आधुनिक वगनाट्य | २६०.०० |
| ४१. | ५७८ | शेकडे वसंत / निवडक नागनाथ कोतापल्ले | १२०.०० |
| ४२. | ५९८ | सिसीलिया कार्व्हालो /माणूस उकरुन काढावा लागतोय | २००.०० |
| ४३. | ७२३ | शेकडे वसंत /निवडक कविता | १००.०० |
| ४४. | ८०३ | कोरपे आप्पा /मी तो हमाल | १५०.०० |

**सन २०१४**

| | | | |
|---|---|---|---|
| ४५. | २८७ | कुबल रमेश /लोकसाहित्याचे अंतरंग | २००.०० |
| ४६. | २९५ | तापस-राजापुरे पुष्पलता/ कोकणातील लोककला | २५०.०० |
| ४७. | ३०८ | पठारे रंगनाथ /आजची कादंबरी नोंदी आणि निरीक्षणे | ३२०.०० |
| ४८. | ३०९ | पठारे रंगनाथ /संचित व संघर्ष | ४४०.०० |
| ४९. | ३१२ | बागले प्रभाकर /साहित्य आणि सांस्कृतिक संवेदन | ५००.०० |
| ५०. | ३३२ | कांडर अजय / आवानओल | १००.०० |
| ५१. | ३६० | बांदेकर प्रविण/ येरु म्हणे | १००.०० |
| ५२. | ४२२ | शिंदे उज्वला /बाईचं घर मेणाचं | २९०.०० |
| ५३. | ४७० | करंजीकर दीपक /आजच्या विश्वाचे आर्त | ३००.०० |
| ५४. | ५३३ | धोंडगे दिलीप /चिंतनासी न लगे वेळ | ३५०.०० |
| ५५. | ९३६ | शिंदे विश्वनाथ / शाहिरी वाङमयाच्या धारा | २४०.०० |
| ५६. | ९६१ | पठारे रंगनाथ /चोषक फलोद्यान | ३७५.०० |

**सन २०१२**

| | | | |
|---|---|---|---|
| ५७. | ४५८ | डॉ. दिलीप धोंडगे/ तुका म्हणे भाग १ | ७००-०० |
| ५८. | ४५९ | डॉ. दिलीप धोंडगे/ तुका म्हणे भाग २ | ७००-०० |
| ५९. | ४६६ | निरगुडकर भारती/ | २००-०० |
| ६०. | ५१० | शेळके भास्कर/मराठी प्रादेशिक कादंबरी स्वरुप आणि विश्लेषण | ४५०-०० |
| ६१. | ५८१ | लांडे सुमती/ कमळकाचा | ३५०-०० |
| ६२. | ८३४ | दराडे उषा/ कुंकवाच्या पलिकडे | २००-०० |
| ६३. | १०१२ | शेळके भास्कर / ग्रंथवेध | ३२०-०० |

**सन २०११**

| | | | |
|---|---|---|---|
| ६४. | ८०८ | पाटेकर ऐश्वर्य/भुईशास्त्र | २२०-०० |
| ६५. | ८१५ | बारहाते लक्ष्मण/ | ८०-०० |
| ६६. | ८२२ | महानोर ना. धों. पाच बिधे बालकवींच्या निवडक कविता | ११५-०० |
| ६७. | ९९४ | डंबीर नीता /वसा पर्यावरणाचा | १२०-०० |

**सन २०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| ६८. | ६५ | चित्रे दिलीप पुरुषोत्तम/तुकोबांचे वैकुंठगमन | १००-०० |
| ६९. | ३६१ | चित्रे दिलीप पुरुषोत्तम/अगतिकांचे जागतिकीकरण | १८०-०० |
| ७०. | ४७१ | पाटणकर जयश्री/संशोधनाची क्षेत्रे व पद्धती | २६०-०० |
| ७१. | ६५५ | इंगळे अशोक रा. /आंबेडकरी साहित्यातील जीवनमूल्ये | ८०-०० |
| ७२. | ७०२ | राजापुरे-तापस पुष्पलता/१९८० नंतरचे स्त्रीनिर्मिती कथनपर साहित्य | ३४०-०० |
| ७३. | ७३९ | गुरव धनाजी/तुर्तास समजावून घेताना | १४०-०० |
| ७४. | ८४८ | कर्णिक मधू मंगेश/भाकरी आणि फूल | ३००-०० |
| ७५. | १०७३ | चित्रे दिलीप पुरुषोत्तम/ ऑर्फियस / | १३०-०० |
| ७६. | १२५९ | चित्रे दिलीप पुरुषोत्तम/तिरकस आणि चौकस | १५०-०० |
| ७७. | १५४८ | पाटील अशोक (संपा.)/ शेतकऱ्यांचे शरद पवार | ७५०-०० |

**सन २००९**

| | | | |
|---|---|---|---|
| ७८. | ६७१ | लुलेकर प्रल्हाद/ भंजनाचे भजन | १२०-०० |
| ७९. | ६७६ | डॉ. शेळके भास्कर/प्रा. साळवे/समीक्षा संकल्पना-स्वरुप | १५०-०० |
| ८०. | ६७८ | सद्रे केशव (संपा.)/ सुषमा करोगल/आणिक टीकास्वयंवर | २८०-०० |
| ८१. | ६७९ | सातपुते पोपट/प्रा. शेळके/चळवळ व साहित्य | ५००-०० |
| ८२. | ७३१ | पावसकर रामकली/ओले अथांग श्वास | १००-०० |
| ८३. | ७७३ | चित्रे/पठारे/प्रत्यय आणि व्यत्यय | १८०-०० |
| ८४. | ८३२ | कदम महेंद्र/धुळपावलं | ३००-०० |
| ८५. | ९०२ | बांदेकर प्रवीण दशरथ/चाळेगत | ६५०-०० |
| ८६. | ९४४ | समर खडस/बकऱ्याची बॉडी | २८०-०० |
| ८७. | १००७ | जाधव मधू/कथाविविधा | १५०-०० |
| ८८. | १०१० | जोशी चि. वि./ जातकांतील निवडक गोष्टी | ४००-०० |
| ८९. | १०२२ | दराडे उषा/आभाळाच्या आरपार | १५०-०० |
| ९०. | १०२६ | देशमुख सदानंद/उठावण | ११०-०० |

**वरील पुस्तके मागविण्यासाठी समोरील नंबरवर संपर्क करा - मो. ९०११२०१४१४/९८२२५२५४४४**

साप्ताहिक शब्दरुतू - हे पत्र मालक, प्रकाशक सुमती साईनाथ लांडे यांना मुद्रक विजय दत्तात्रय नगरकर यांनी आदित्य प्रिंटर्स, कामगार सदन, क्रॉस मेनरोड, श्रीरामपूर-४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून शब्दालय प्रकाशन, पोस्ट बॉक्स नं.९०, वार्ड नं.७, आयडीया टॉवरजवळ, श्रीरामपूर ४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक- सुमती साईनाथ लांडे Total Code - SR.NO./MAG/11/2021